**प्रेसनोट दिनांक १२/०४/२०१९**
**पोलीस स्टेशन :- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**महिलांचे सुरक्षेच्या दृष्टीने राबविण्यात येणारे 'बडीकॉप' या संकल्पने अंतर्गत येरवडा पोलीस स्टेशनचे अधिकारी यांनी इशान्य मॉल, नागपूर चाळ, पुणे येथील महिलांची बैठक घेऊन, सुरक्षितते संदर्भात त्यांना मार्गदर्शन केले बाबत.**

---

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे स्तरावर आय.टी.क्षेत्रातील तसेच इतर क्षेत्रातील नोकरदार महिलांचे सुरक्षेच्या दृष्टीने 'बडीकॉप' ही संकल्पना राबविण्यात येत आहे. सदर संकल्पने अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली दि.१०/०४/२०१९ रोजी ११:५५ वा. ते १३:१० वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील ईशान्य मॉल, एअरपोर्ट रोड, नागपूर चाळ, पुणे या व्यावसायिक संकुलातील महिला अधिकारी, कर्मचारी नोकरदार वर्ग यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये येरवडा पोलीस स्टेशनचे पो.उप.निरी. श्री. विठ्ठल माने यांनी उपस्थित महिला वर्गाला बडीकॉप संकल्पनेची माहिती दिली. तसेच त्यांचे सुरक्षिततेच्या संदर्भात घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शन केले. तसेच जेष्ठ नागरिक, महिला, बालके यांचे तक्रारींचे निराकरण करणेसाठी पोलीस आयुक्तालय पुणे येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या 'भरोसा सेल' ची माहिती दिली. याशिवाय मा.पोलीस आयुक्त सा़े. पुणे शहर यांनी नागरिकांचे सुरक्षा व सुव्यवस्थेकरीता पुणे शहर आयुक्तालयाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध १४ योजनांची माहिती दिली आहे.

अशा प्रकारे येरवडा पोलीस स्टेशन कडील श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी.श्री. विठ्ठल माने यांनी बडीकॉप संकल्पनेअंतर्गत ईशान्य मॉल येथील महिला नोकरदारवर्ग यांची बैठक घेऊन त्यांना सुरक्षितते संदर्भात मार्गदर्शन करून, उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



